Rotary UNITE FOR GOOD

# Sunshine

## Monthly Bulletin of

# Rotary Club of Sangli

RI Dist. 3170

## 2025-26

**Club President : Rtn. Mahesh Jhanwar**

**Club Secretary : Rtn. Dr. Abhijit Udgaonkar**

**Rotary International President : Rtn. Francesco Arezzo**

**District Governor : Rtn. Er. Arun Bhandare**

Rotary District 3170

LET'S CREATE A LEGACY

2025-26

Editor : Rtn. Dr. Suhas Joshi

Editorial Board

Rtn. Dr. Chandrashekhar Purandare

Rtn. Er. Bipin Shevade

## October 2025

## From the Editor's Desk

*Rtn. Dr. Suhas Joshi*



### The Rotary Foundation

The Rotary Foundation is the charitable arm of Rotary International, dedicated to advancing world understanding, goodwill, and peace by funding projects that improve health, provide quality education, improve the environment, and alleviate poverty globally.

It is supported solely by voluntary contributions from members and the public. The Foundation has transformed millions of lives through over $4 billion spent on sustainable, life-changing initiatives since its founding in 1917.

### Mission and Focus Areas

The mission of The Rotary Foundation centers on enabling Rotarians to tackle global challenges in health, education, poverty, and peace—often with a local touch. Its seven key areas of focus guide grants and projects worldwide.

### Grants and Impact

The Foundation awards hundreds of millions of dollars in grants yearly, supporting humanitarian projects, vocational training, and scholarships in various cause areas.

Rotary grants range from modest, short-term activities to large, international endeavors, strengthening global partnerships and bringing sustainable, measurable benefits to communities.

Examples include polio eradication efforts, clean water initiatives, disaster relief, and peace fellowships.

### Structure and Financial Management

The headquarters are in Evanston, Illinois, USA, and the Foundation is governed by a Board of Trustees with associate foundations in several countries, including India, Brazil, and the UK.

**The Rotary Foundation - *continued***

**Financial Stewardship**

The Rotary Foundation is renowned for its financial efficiency, with most funds spent directly on programs and projects and consistently receiving top ratings from charity evaluators.

**How to Give and Get Involved**

Donations fuel the Rotary service projects and can be directed to specific causes or general funds. Donors may contribute online via direct bank transfers or in-country options, allowing targeted giving to issues that matter most.

**Notable Programs**

- Scholarships, including Rotary Peace Fellowships at world-class institutions.
- Support for local and international humanitarian efforts.
- Enabling tax benefits for donors in certain countries, such as India.
- The Rotary Foundation leverages global Rotarian networks, efficient financial stewardship, and focused project funding to create lasting positive change worldwide.

So donate generously to the Rotary Foundation to do good in the world.

**Donate My Rotary https://share.google/pY9OIktr0MO5yBhVc**



Rotary Club of Sangli

# Sunshine

October 2025

## President's Message

### *Rtn. Mahesh Jhanwar*



Dear Rotarians,

Warm greetings to the entire Rotary Club of Sangli family.

The month of October has brought new inspiration, learning, and renewed energy for service. Over the past weeks, we have conducted meaningful meetings, fellowship activities, and impactful community service initiatives. I sincerely thank each one of you—your active participation is the true strength of our club.

We began October with enriching sessions that reminded us of our responsibilities towards society and helped us understand Rotary values more deeply. These moments of fellowship continue to strengthen our unity and team spirit.

As we move forward into the next phase of the Rotary year, I request all members to join hands and bring even more momentum to our projects.

Whether it is education, health, environment, or community upliftment, our service is needed everywhere—and even small efforts can create lasting change. Rotary has always been a symbol of such meaningful impact.

I also encourage all members to focus on inviting new individuals to join our Rotary family. Each new member brings fresh ideas, energy, and opportunities for greater service.

Let us work together to make this month another chapter of achievements and contribute to enhancing the influence of Rotary in Sangli.

Thank you once again for your dedication and continued support.

Let us keep moving ahead with the spirit of “Service Above Self.”

With Rotary greetings.

## Secretarial Report



### Rtn. Dr. Abhijit Udgaonkar

**Meeting No. 14**

**Date: Friday, 3 Oct 2025 : "संकल्पना– आत्मनिर्भर व विकसित सांगलीसाठी नागरिकांचे योगदान : पालकमंत्री कार्यालय "**

The 14th regular weekly meeting of the Rotary Club of Sangli was held jointly with the Rotary Club of Sangli Midtown on Friday, 3rd October 2025 at Rotary Club Hall, Ganesh Nagar, Sangli. The meeting was convened in observance of Rotary International's Community Economic Development Month.

President of Rotary club of Sangli Rtn. Maheshkumar Jhanwar extended a cordial welcome to all dignitaries, members, Anns, and Annets, emphasizing the importance of community participation in Sangli's developmental journey and the role of Rotary in fostering self-reliance and progress. Senior Rotarian Rtn. Kishor Lulla introduced the Chief Guest, Mr Vijay Warudkar, highlighting his contributions to civic governance and development. One minute Rotary Information was delivered by a past president Rtn Dr Bhaskar Tamhankar of RC Sangli.

The Chief Guest, Mr Vijay Warudkar, delivered an inspiring lecture on "संकल्पना– आत्मनिर्भर व विकसित सांगलीसाठी नागरिकांचे योगदान : पालकमंत्री कार्यालय ". He elaborated on the developmental projects undertaken by the Guardian Minister's Office, emphasizing collective responsibility and the active role of Sangli's citizens in building a self-reliant and progressive city.

He also highlighted the importance of coordinated efforts between government departments and social organizations.

The talk was engaging, and the guest speaker interacted enthusiastically with the Rotarians during the discussion session.

In the same meeting Rtn Harshad Subhash and Rtn CA Makrand Karmarkar of RC Sangli had donated to Rotary foundation and Rotary Club of Sangli projects.

Rotary
Club of Sangli

Sunshine

October 2025

## Secretarial Report – *continued*

A formal Vote of Thanks was proposed by Rtn. Y. V. Kulkarni of RC Sangli Midtown , expressing gratitude to the Chief Guest, members of both clubs for their active participation and support staff for the meeting in making the event a grand success.

Secretarial announcements were made by Rtn. Dr. Abhijit Udgaonkar (RC Sangli) and Rtn. Sudhir Mhetri (RC Sangli Midtown). The meeting is attended by 65 members.






## Secretarial Report – *continued*

**Meeting No. 15**

**Date: Thursday, 9th October 2025**

**Venue: Farmhouse of RC Sangli member Rtn. Dr. Shishir Gosavi, Kolhapur–Solapur National Highway, Miraj**

**“Kojagiri Musical Night – चांदण्यातली जादू आणि सुरांचा जल्लोष”**

The 15th regular weekly meeting of the Rotary Club of Sangli was conducted under the leadership of President Rtn. Mahesh Jhanwar and Secretary Rtn. Dr. Abhijit Udgaonkar.

On the occasion of Kojagiri Pournima, a special cultural evening titled “Kojagiri Musical Night – चांदण्यातली जादू आणि सुरांचा जल्लोष” was organized.

The musical journey had songs sung from golden old classics , disco hits , contemporary Bollywood favourites, entertaining all present.

A total of 16 participants — Rotarians, Anns and Annets sang a variety of songs sung melodiously !

Anchoring was conducted in a distinct and engaging style by Rtn. Pranand Joshi and Ann Supriya Joshi. Ann Mrs. Swapna Udgaonkar coordinated whole musical event exceptionally. Rtn. Dr. Shishir Gosavi made excellent arrangements for the event. His entire family actively supported and coordinated the arrangements, ensuring a smooth and enjoyable experience for everyone.

The program received great appreciation and was considered a grand success. It witnessed a magnificent gathering of over 150 enthusiastic members, accompanied by their gracious Anns and vibrant Annets, making it a truly momentous occasion filled with energy, camaraderie, and joy.

Rotary
Club of Sangli

# Sunshine

October 2025
























CHIEF GUEST
PRESIDENT
कार्यवाह



## Secretarial Report – *continued*

### Meeting No. 16

### Date : Thursday, 16 Oct 25

## दक्षिण कोरियातील आयर्न मॅन स्पर्धेतील अनुभव

The 16th regular weekly meeting of the Rotary Club of Sangli was held on Thursday, 16th October 2025, at Rotary Club Hall, Ganeshnagar, Sangli. After the customary Rotary formalities, the President Rtn Mahesh Jhanwar extended a warm welcome to all members, Anns, and Annets present for the evening.

The highlight of the meeting was the presence of Mr. Kiran Sahu, Founder President of Ambitious Endurance Club, Sangli, who graced the occasion as Chief Guest and Speaker. Mr. Sahu and his team have brought immense pride to Sangli by successfully participating in the Ironman Competition held in South Korea, representing the largest group from India to complete a full Ironman event abroad.

Mr. Sahu delivered an inspiring and motivational talk titled “Experience in the South Korea Ironman Competition”, sharing his team’s journey of dedication, endurance, and teamwork. His narration of the rigorous training, challenges faced, and the spirit of achievement deeply inspired all present.

The Rotary Club of Sangli felicitated Mr. Kiran Sahu and his other 13 team members for their exceptional accomplishment and contribution to promoting fitness and determination among the youth. The felicitation ceremony was marked by applause and admiration from all Rotarians.

The chief guest Mr Kiran Sahu was introduced by past president Rtn Salil Limaye , while vote of thanks was proposed by past president Rtn Pramod Patil . Secretarial announcement was made by Secretary Rtn Dr Abhijit Udgaonkar. The meeting was attended by 86 members.

.


Rtn. Francesco Arezzo
R. I. President
Rtn. Arun Bhandare
District Governor Dist. 3170
Rtn. Dharmendra Khilare
Asst. Governor Dist. 3170
Rtn. Maheshkumar Jhanwar
President
YEAR 2025 - 26
IRONMAN
Rotary
SECRETARY


Rtn. Francesco Arezzo
R. I. President
Rtn. Arun Bhandare
Rtn. Dharmendra Khilare
Rtn. Maheshkumar Jhanwar
President
UNITE FOR GOOD
YEAR 2025 - 26
IRONMAN
Rotary
Rotary

## Secretarial Report – *continued*

**Meeting No. 17**

**Date:Thursday,23 Oct 25**

### “दिवाळीच्या गाठीभेटी”

The 17th regular weekly meeting of the Rotary Club of Sangli was held on दिवाळी भाऊबीज on Thursday, 23rd October 2025, at Rotary Hall, Sangli. The event, titled “दिवाळीच्या गाठीभेटी” (Diwali Get-together), was celebrated with great enthusiasm and warmth. The hall was beautifully adorned with diyas, colorful lanterns, and decorative lights, creating a radiant festive ambiance that symbolized joy, togetherness, and the true essence of Diwali.

The President extended heartfelt Diwali greetings to all Rotarians, Anns, and Annets, emphasizing that such gatherings strengthen fellowship and unity within the Rotary family. The Secretary also conveyed warm wishes for a happy and prosperous Diwali, expressing gratitude for the camaraderie and collective spirit that define the club.

The evening was filled with laughter, happiness and cheerful exchanges of greetings and sweets among members and families. A spectacular display of firecrackers and light decorations illuminated the Rotary premises, making it a real festival of lights. The vibrant atmosphere reflected the joy of celebration and the shared bond of friendship that Rotary embodies.

The Diwali fellowship meet was a delightful blend of celebration and togetherness, exemplifying the Rotary spirit of unity, joy, and service above self. The President thanked all members and families for their enthusiastic participation and contribution to the evening’s success. The meeting concluded with fellowship, photographs, and festive cheer. The meeting was attended by 28 members.




75
PLATINUM
JUBILEE YEAR
ROTARY CLUB OF SANGLI

## Secretarial Report – *continued*

### Meeting No. 18

### Date: Thursday,30 October 25

### "India @ 2047 & Mistakes to Avoid in Investing"

The 18th regular weekly meeting of the Rotary Club of Sangli was held on Thursday, 30th October 2025, at Rotary Hall, Sangli. As part of Rotary International's Community Economic Development Month, the evening featured a special lecture on "India @ 2047 & Mistakes to Avoid in Investing", delivered by Mr. Gaurav Gupta, CEO, Indus Capital — a renowned financial strategist known for his clarity in simplifying complex investment ideas.

Mr. Gupta captivated the audience with an insightful and interactive session focusing on financial awareness and responsible investment. He explained the principles of sound financial planning, emphasizing:

- The importance of making informed investment decisions in a dynamic economic environment
- Common mistakes that investors should consciously avoid
- The value of financial literacy as a cornerstone for long-term wealth creation
- India's evolving economic vision towards 2047 and its implications for individual and national financial growth

The talk was engaging, practical, and extremely relevant for members, who appreciated the clarity and depth of Mr. Gupta's financial wisdom.

The session was followed by an interactive Q&A, during which members exchanged ideas and sought valuable guidance from the speaker on managing personal and community investments effectively. The event reflected Rotary's broader mission to empower individuals through knowledge, thereby contributing to community economic development.

The meeting successfully combined intellectual enrichment with Rotary camaraderie.

In the same meeting, News Bulletin - September 2025 of Rotary Club of Sangli was published by editor Rtn Suhas Joshi. Also AKS Rtn. Kishor Lulla has declared donation of $1000 (USD) to AG Endowment fund.

The meeting was attended by 80 members.


Rtn. Francesco Arezzo
R. I. President
Rtn. Arun Bhandare
UNITE FOR GOOD
LEGACY
Rotary
Club of Sangli
CHIEF GUEST



## Vocational Service Project : Secretarial Report

## रेक्झीन रांगोळी प्रशिक्षण कार्यशाळा

### दिनांक : शनिवार ४ ऑक्टोबर २०२५ : वेळ दुपारी १२.०० ते सायं. ४.०० : स्थळ रोटरी हॉल, गणेशनगर, सांगली

रोटरी क्लब ऑफ सांगली आणि इनरव्हील क्लब ऑफ सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने रेक्झीन रांगोळी प्रशिक्षण कार्यशाळा दिनांक ४ ऑक्टोबर २०२५ रोजी रोटरी क्लब ऑफ सांगली हॉल येथे आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेला महिलांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या कार्यशाळेचे उद्दिष्ट महिलांमध्ये कलात्मक सर्जनशीलता आणि सांस्कृतिक अभिव्यक्तीला प्रोत्साहन देणे, तसेच सणासुदीच्या काळात नवीन सजावटी कलाकौशल्ये आत्मसात करण्यास प्रेरित करणे हे होते. समाजातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि कला-आधारित शिक्षणाद्वारे सहभाग वाढविण्यासाठी हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यशाळेची ठळक वैशिष्ट्ये:

- प्रशिक्षकांनी रंगीत पूड, रेक्झीन, मार्कर्स, ट्रेसिंग पेपर आणि विविध नमुन्यांचा वापर करून रांगोळी डिझाईन करण्याच्या विविध तंत्रांचे उत्कृष्ट प्रात्यक्षिक दाखवले.
- सहभागी महिलांनी पारंपरिक आणि आधुनिक रांगोळीच्या नमुन्यांचा सराव करत सर्जनशीलता आणि सांस्कृतिक सौंदर्य यांचा सुंदर संगम घडविला.
- कार्यशाळेत शहरातील विविध भागांतील महिलांचा उत्साही सहभाग दिसून आला, ज्यामुळे आनंद, शिक्षण आणि कलात्मक अभिव्यक्तीचे वातावरण निर्माण झाले.
- या कार्यशाळेत एकूण ३५ महिला सहभागी झाल्या.

## Vocational Service Project : Secretarial Report

### रेक्झीन रांगोळी प्रशिक्षण कार्यशाळा – *continued*

कार्यशाळेच्या शेवटी संपूर्ण हॉल रंगीबेरंगी रांगोळ्यांनी उजळून निघाला होता, ज्यातून सर्जनशीलता, सौहार्द आणि सणांचा उत्साह प्रतीत झाला.

या कार्यक्रमाचे आयोजन यशस्वी होण्यासाठी इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा सौ. पल्लवी मराठे आणि सचिव सौ. सविता तांगडी यांनी विशेष परिश्रम घेतले. रोटेरियन सौ. सुधाताई कुलकर्णी आणि रोटेरियन सौ. हेतल गांधी यांनीही कार्यक्रमात उपस्थिती दर्शवली. तसेच रोटरी क्लब ऑफ सांगलीचे सचिव डॉ. अभिजित उदगांवकर यांनीही कार्यशाळेला भेट दिली.



## Community Service Project

रोटरी क्लब ऑफ सांगलीतर्फे गरजू मुलांना सायकली व दिवाळी “शिधा” वाटपदिनांक १६ ऑक्टोबर २०२५ रोजी रोटरी क्लब ऑफ़ सांगलीने रोटरी हॉल, सांगली येथे आकार फाऊंडेशन, सांगली या सामाजिक संस्थेने केलेल्या आवाहनानुसार गरजू मुलांना दिवाळीच्या पूर्वसंध्येला  मदत म्हणून सायकली व दिवाळी “शिधा” वाटप केले.

यामध्ये अनाथ किंवा एकल पालक असलेल्या गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना मदत केली गेली.

रो चंद्रशेखर पुरंदरे, रो अशोक सावंत, रो डॉ अभिजित उदगांवकर, रो अभय भगाटे, रो चिदंबर मगदूम, रो आदित्य बावडेकर, रो शंतनू कुलकर्णी, रो प्रमोद सारडा यांनी ८ नवीन सायकली या विध्यार्थ्यांना दान केल्या, तसेच रोटरी क्लब ऑफ सांगलीच्या संचालक मंडळाने दिवाळी “शिधा” (किराणा) पाकिटे १० विध्यार्थी व त्यांच्या पालकांना दिली.

हा कार्यक्रम क्लबचे अध्यक्ष रो महेश झंवर, सचिव रो डॉ अभिजित उदगांवकर, संचालक मंडळ व रोटरी सभासद यांच्या उपस्थितीत पार पडला.यावेळी अनाथ किंवा एकल पालकांच्या कुटुंबातील गरजू मुलांच्या चेहर्यावर दिवाळीचा आनंद दिसत होता.

तसेच २० ऑक्टोबर रोजी रोटरी क्लब ऑफ सांगली तर्फे दिवाळी निमित्त  दरवर्षीप्रमाणे मेघालय वसतिगृह येथे २१ मुलांना दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले.

हे कार्यक्रम म्हणजे क्लबच्या समाजसेवेसाठीच्या बांधिलकीचे खरे प्रतीक होय.

.


ROTARY CLUB OF SANGLI


ROTARY CLUB OF SANGLI

## Community Service Project

मेघालय वसतिगृह येथे दिवाळी फराळाचे वाटप
दिनांक: २० ऑक्टोबर २०२५ स्थळ: मेघालय वसतिगृह,सांगली

२० ऑक्टोबर २५ रोजी, रोटरी क्लब ऑफ सांगली तर्फे दिवाळी निमित्त दरवर्षीप्रमाणे मेघालय वसतिगृह येथे दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. यामुळे २१ गरीब मुलांची दिवाळी आनंदाने साजरी होत आहे. यावेळी रोटरी क्लब ऑफ सांगलीचे अध्यक्ष रो महेश झंवर, रो रामकृष्ण चितळे ,रो विजय बजाज,रो डॉ अभिजित लेंडवे, रो आदित्य बावडेकर,रो चिदंबर मगदूम आदी उपस्थित होते.





## Community Serivce Project

### रोटरी क्लब ऑफ सांगली तर्फे वृक्षारोपण

दिनांक: ९ ऑक्टोबर २०२५ वेळ: सकाळी १० ते १२

स्थळ: ८० फुटी रस्ता, विश्रामबाग, सांगली

दि. ०९.ऑक्टोबर २०२५ रोजी रोटरी क्लब ऑफ सांगली व समाजसेविका रो. डॉ. रतन पाटील यांच्या वतीने ८० फुटी रस्ता, विश्रामबाग, सांगली येथे १६ भारतीय झाडांचे वृक्षारोपण रोटरी क्लब ऑफ सांगली , सांगली महापालिका आणि स्थानिक नागरिक यांच्या उपस्थितीत झाले.

ज्येष्ठ नागरिक डॉ. पाटील या स्वत: रोटरी क्लब ऑफ सांगलीच्या सदस्य आहेत. झाडांची त्यांना आवड आहे. याबाबत काहीतरी चांगले उदाहरण तयार व्हावे म्हणून त्यांनी या वयातही स्वत: धावपळ करून खड्डे काढले. ते शास्त्रीय पध्दतीने भरून घेतले. उंच व मोठी रोपे, ट्री गार्डस् आणले.

रोटरी क्लब ऑफ सांगलीचे सेक्रेटरी रो. डॉ. अभिजित उदगावकर व महापालिका उद्यान अधिक्षक श्री. अजित गुजराथी यांच्या हस्ते रोपे लावून शुभारंभ झाला. मुचकूंद, रीठा, बेहडा, कुसूम, सीता अशोक, अर्जून, बहावा, चाफा, बेल, कांचनार, पळस अशा भारतीय झाडांची लागवड करण्यासाठी वनस्पती अभ्यासक रोहन पाटील यांनी सहकार्य केले.

या कार्यक्रमात कौस्तुभ पोळ, मानद वन्यजीव रक्षक अजितकुमार पाटील, रो. डॉ. सी. एस. पुरंदरे, रो. लक्ष्मीकांत झंवर, रो. अमित कुर्बेट्टी, रो. रणधीर पटवर्धन, रो. आदित्य बावडेकर, आनंद कन्स्ट्रक्शनचे विहंग शहा, नारायण आपटे आणि आण्णासाहेब भोसले हे उपस्थित होते.







Rotary Club of Sangli
Sunshine
October 2025

. **Community Service**

वाचन प्रेरणा दिन ( सलग १२ तास वाचन उपक्रम)
दिनांक: १५ ऑक्टोबर २०२५ वेळ: सकाळी ८ ते रात्री ८
स्थळ: रोटरी कम्युनिटी हॉल, गणेशनगर, सांगली

भारतरत्न माजी राष्ट्रपती डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त १५ ऑक्टोबर २५ रोजी रोटरी कम्युनिटी हॉल, गणेशनगर, सांगली येथे वाचन प्रेरणा दिनाचे आयोजन केले होते. या उपक्रमाचे हे सलग ५ वे वर्ष आहे.

संवादिनी, वाचन प्रेमी वाचनालय, रोटरी क्लब ऑफ सांगली आणि इनरव्हील क्लब ऑफ सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम अतिशय उत्साहात पार पडला. या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे सकाळी आठ ते रात्री आठ असे सलग ( न खंड पडता) बारा तास वाचन उपक्रमाचे नियोजन केले होते.दरवर्षी जवळजवळ १४३ वाचक आणि विविध संस्था या उपक्रमात उत्साहाने सहभाग नोंदवतात.

सकाळी बरोबर आठ वाजता रोटरी क्लबचे रो गिरीश तंगडी, इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा सौ.पल्लवी मराठे , सचिव सौ.सविता तंगडी व माजी अध्यक्षा सौ सुनीता बजाज यांनी  वाचन उपक्रमास सुरुवात केली.

संवादिनी ग्रुपच्या सौ अर्चना मुळे यांनी उपक्रमाची सविस्तर माहिती दिली. समाजातील सर्व घटकांमध्ये वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबवत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच सौ.श्वेता चितळे,  सौ.सुनंदा कदम, सौ.विजया हिरेमठ, सौ.दिपाली वाळवेकर, सौ.माधवी ठाणेकर, सुलभा तांबडे,अश्विनी पोटे,  सौ.शाल्मली वझे , सौ.मानसी गोखले, सौ.सपना काप्रतवार, सौ.अनुराधा सलगर आणि इतर संवादिनीनि नियोजन केले.

रोटरी क्लब ऑफ सांगलीचे अध्यक्ष रो महेश झंवर, सचिव रो डॉ. अभिजित उदगावकर हेही उपस्थित होते. त्यांनी या उपक्रमाचे खूप कौतुक केले. तसेच रोटरी क्लब ऑफ सांगलीचे सचिव रो डॉ अभिजित उदगावकर यांनी वाचन करून उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

Rotary Club of Sangli
Sunshine
October 2025

तसेच सौ.मंजुश्री पटवर्धन,सौ.मुग्धा उदगावकर,सौ.अर्चना येडेकर,सौ.अंजली कोले, सौ.मीनाक्षी हवाने,सौ.शीतल माळी, सपना वाघिले, अर्चना वैद्य, सौ.स्नेहल खरे आणि इतर इनरव्हील सभासदांनी ही वाचन केले.

वैयक्तिक वाचना बरोबरच संस्कार भारती ग्रुप, जिल्हा नगर वाचनालय सांगली, कस्तुरबा वालचंद कॉलेज, अंधश्रद्धा निर्मूलन समिती, जिल्हा महिला परिषद आणि इतर वेगवेगळ्या संस्थांनीही समूह वाचन करून या वाचन उपक्रमात सहभाग नोंदवला.उपस्थित सर्वांनी या स्तुत्य वाचन उपक्रमाचे खूप खूप कौतुक केले.






Rotary Club of Sangli

# Sunshine

**October 2025**









## One Minute Rotary



By

PP Rtn. Dr. Chandrashekhar Purandare

### मीटिंग क्र. १४ : शुक्रवार ०३-१०-२०२५

### रोटरी आणि पोलिओ निर्मूलन

आपणा सर्वांना हे माहित आहे की रोटरीने पोलिओ निर्मूलनासाठी खूपच महत्त्वाचे योगदान दिलेले आहे. आपण त्याची थोडक्यात माहिती करून घेऊ या.

१९७९ साली रोटरीने फिलिपाईन्स देशामध्ये या मोहिमेचा प्रारंभ करून 60 लाख मुलांचे यशस्वी पोलिओ लसीकरण केले.

१९८८ साली रोटरी व W.H.O. यांनी संयुक्तपणे लसीकरणाची सुरुवात केली, त्यावेळी १२५ देशात जवळपास साडेतीन लाख पोलिओ रुग्ण होते. ३६ वर्षानंतर आज मात्र अफगाणिस्तान व पाकिस्तान या दोनच देशात मोजके रुग्ण आहेत.

१९९४ साली अमेरिका तर २०१२ साली भारत पोलिओमुक्त झाला. २००९ साली बिल व मेलिंडा गेट्ष फाउंडेशनने रोटरीला या उपक्रमासाठी २०० मिलियन डॉलर्स देणगी दाखल दिले. रोटरीचे या कार्यक्रमासाठीचे आतापर्यंतचे एकूण कॉन्ट्रीब्युशन जवळपास १००० मिलियन डॉलर्सचे आहे. शिवाय लाखो रोटेरिअन्स प्रत्यक्ष लसीकरणात सहभागी होतात.

आपला क्लबही डिसेंबर-जानेवारी मधील पोलिओ लसीकरणाच्या दिवशी पोलिओ स्वयंसेवकांना फूड पॅकेट्षचे वाटप करतो. गेली अनेक वर्षे हा उपक्रम चालू आहे.

## One Minute Rotary

### मीटिंग क्र. १५ : ०९-१०-२०२५

आज आपण रोटरीचे संस्थापक पॉल हॅरिस यांच्याबद्दल थोडी माहिती घेऊ या.

१९ एप्रिल १८६८ साली जन्मलेल्या पॉल यांना घरच्या गरिबीमुळे वयाच्या अवघ्या तिसऱ्या वर्षीच आजोबांकडे राहावयास जावे लागले. १८९१ साली त्यांनी आयोवा विद्यापीठातून कायद्याची पदवी प्राप्त केली. पुढील पाच वर्षे त्यांनी छोटी-मोठी कामे केली आणि १८९६ साली शिकागो येथे वकिलीची सुरुवात केली.

वकिलीचा उद्योग वाढविण्यासाठी आणि अधिकाधिक मित्र मिळवण्यासाठी त्यांनी २३ फेब्रुवारी १९०५ या दिवशी रोटरीची तीन मित्रांच्या मदतीने स्थापना केली. १९१० साली त्यांनी जीन थॉम्प्सन यांच्याशी विवाह केला, आणि जीन यांनी त्यांच्या सर्व कामात आयुष्यभर त्यांना मनापासून सहकार्य केले.

२७ जानेवारी १९४७ साली त्यांचे निधन झाले, तेव्हां फक्त ४ सदस्यांनिशी सुरू केलेल्या रोटरीचे ७५ देशात दोन लाख सदस्य झाले होते. २००५ साली त्यांचे कोमली हॉल येथील घर रोटरीने खरेदी करून त्याचे म्युझियममध्ये रूपांतर केले.

### मीटिंग क्र. १६ : १६-१०-२०२५

### रोटरी अँन्सबद्दल थोडी गंमतशीर माहिती

आपल्याकडे रोटेरिअन्सच्या पत्नीला ॲन म्हटले जाते. का बरे?

१९१४ सालच्या ह्यूस्टन रोटरी अधिवेशनासाठी जाणाऱ्या ट्रेन मध्ये रोटेरियन्स बरोबर दोघांच्या पत्नींचाही समावेश होता. ॲन ब्रूनियर आणि ॲन गुंडाकर !

यांची प्रत्यक्ष नावेच ॲन अशी होती. ह्यूस्टन ला जाईपर्यंत सर्वांची दोस्ती झाली, आणि तिथे सर्वांनी त्या दोन्ही अँन्सची मिरवणूक काढून त्यांना सन्मानित केले.

## One Minute Rotary

या दोन्ही अँन्सचे पती १९२३ आणि १९५२ साली रोटरी अध्यक्ष झाले.

अशा रीतीने ह्यूस्टन अधिवेशनपासून रोटेरिअन्सच्या पत्नींना ॲन्स म्हणण्याची पद्धत रूढ झाली आहे.

## मीटिंग क्र. १७ : २३-१०-२०२५

## रोटरी पुरस्कृत इंटरॅक्ट क्लब

आपल्याला माहीत असलेल्या रोटरॅक्ट क्लब स्थापनेच्या सहा वर्षे पूर्वीच म्हणजे १९६२ साली अमेरिकेत फ्लोरिडामधील मेलबोर्न येथे पहिला इंटरॅक्ट क्लब सुरु झाला. १२ ते १८ वयोगटासाठी याची रचना करण्यात आली आहे. International मधील Inter आणि action मधील act शब्द घेऊन Interact शब्द बनविण्यात आला आहे.

जगभरातील युवकांविषयी अधिक माहिती, नेतृत्वगुण विकास व समाजसेवी उपक्रमांचा कार्यानुभव ही याची मुख्य उद्दिष्टे आहेत. आज १०९ देशांत जवळपास १३००० क्लबमध्ये 3 लाखांवर Interact सदस्य आहेत, व यांची प्रशिक्षण शिबिरे, डिस्ट्रिक्ट असेम्ब्ली तसेच डिस्ट्रिक्ट कॉन्फरन्स ही होतात.

## मीटिंग क्र. १८ : ३०-१०-२०२५

## रोटरी मासिक

रोटरी उद्दिष्टे व कार्यक्रमांचा योग्य प्रसार व्हावा व रोटेरियन्सशी संपर्क साधणे सोपे जावे यासाठी १९११ सालापासून दि रोटेरियन हे मासिक प्रकाशित होत आहे. रोटरीच्या अध्यक्षांची प्रमुख धोरणे सदस्यांपर्यंत पोहोचविणे, विविध रोटरी बैठकांबद्दल माहिती देणे, तसेच रोटरीतील महत्त्वाच्या विषयांबद्दल माहिती देणे, रोटेरियन्स व रोटरी क्लब यांनी केलेल्या विविध उपक्रमांची माहिती देणे आणि काही मनोरंजक विषयांबद्दलही लिखाण देणे ही सर्व उद्दिष्टे या मासिकाद्वारे पूर्ण केली जातात.

## One Minute Rotary

या मासिकाचे नाव बदलून आता The Rotary असे झाले आहे व ते इंटरनेटवरही उपलब्ध असते. या इंग्रजी मासिकाव्यतिरिक्त इतर २१ भाषांमध्येही रोटरी मासिके प्रकाशित होतात.

भारतात चेन्नई येथून इंग्रजी, हिंदी व तामिळ भाषांमध्ये रोटरी न्यूज व रोटरी समाचार ही मासिके प्रकाशित होतात. याची फी भरणे सदस्यांवर बंधनकारक आहे. आपल्यातील प्रत्येकाच्या घरी हे मासिक दर महिन्याला येते, ते जरूर वाचावे.




**रोटरी क्लब ऑफ सांगली तर्फे**

**आपणास आणि आपल्या परिवारास**

**दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा**



## निसर्गाची जाण आणि भान असणारे रोटरीयन....

***रो. प्रा. संजय ठिगळे, सांगली.***

*“खेड्याकडे चला” एवढेच नव्हेतर*
*“निसर्गाकडे चला”असा संदेश देणाऱ्या महात्मा गांधीजींच्या विचारांचा वारसा घेऊन रोटरी क्लब ऑफ सांगलीच्या वतीने गगनबावडा आणि गगनगिरी परिसरात सहलीचे आयोजन करण्यात आले. हॉटेल दि क्लाउड मधील वातावरण निस्सार्गाच्या सानिध्यात घेतलेला अनुभव. अलीकडच्या काळात निसर्गाच्या सानिध्यात जायचे आणि प्रदूषण करायचे या प्रवृत्तीला फाटा देऊन पर्यटन करीत असताना निसर्गाचा ऱ्हास होणार नाही याची काळजी घेण्यात आली. एव्हाना हेच निसर्ग संस्कार रोटरी परिवारातील चुमुकल्यानी जतन केले.*

----------------------------------------------------------------------

माणूस हा खरेतर निसर्गप्रेमी आहे. त्याला दैनंदिन व्यापातून थोडासा विरुंगळा म्हणून निसर्गाच्या सानिध्यात फिरायला जावेसे वाटते. एवढेच नव्हेतर भ्रमंती करता करता “निसर्ग राजा ऐक सांगतो कुणी माझ्या मनात लपलंय रं असेही तो दिलखुलास म्हणायला कचरत नाही. “ निसर्गाला साद घालणाऱ्या माणसाला निसर्गाच्या मनात काय लपले आहे हे समजत नाही किंवा समजून लक्षपूर्वक दुर्लक्ष केले जाते हेच खरे आहे. अलीकडच्या काळात पर्यटन क्षेत्र अधिक विकसित होऊ लागले आहे. त्याचा परिणाम रोटरीयन च्या मनावर झाला नाहीतर विशेष. रोटरी क्लब ऑफ सांगलीच्या वतीने रोटरी परिवारातील कौटुंबिक सहलीचे आयोजन करण्यात आले.

सहल म्हटली कि खाणेपिणे तर आलेच पण काय खावे आणि काय खाऊ नये याचे भान असलेल्या रोटरी परिवाराने पूर्ण शाकाहारी भोजनाचे आयोजन करण्यात आले होते. कुठेही प्लास्टिकचा वापर नाही एवढेच नाही हा शिरस्ता असल्यामुळे खऱ्या अर्थाने सहल इको फ्रेंडली झाली असे म्हणायला काहीच हरकत नाही.

निसर्गाच्या सानिध्यात जायचे. जंगलात फिरायचे ही एक औरच मज्जा अनुभवायला मिळते. त्याचा आनंद गगनबावडा परिसरातील जंगलात फिरताना मिळाला. खरेतर जंगलातून फिरताना काही प्राथमिक ज्ञान अवगत असणे अपेक्षित होते. ते ज्ञान देण्याचे काम रोटरी परिवारातील नेहमी भ्रमंती करणाऱ्या जाणकारांनी दिले होते. आम्ही जंगलात फिरायला सुरवात केली. जागोजागी दिसणारे साप, पक्षांचा आवाज, जंगलातून फिरणाऱ्या प्राण्यांच्या पायाचे ठसे, माहित असणारी आणि नसणारी झाडे, उंच टेकड्या, पठारावर गेल्यावर घेतलेला मोकळा श्वास आणि प्रदूषण मुक्त हवा. एक वेगळाच आनंद.

सहलीतून शिकायला मिळालेली सर्वात मोठी गोष्ट म्हणजे एरवी कोट्यावधी रुपयांची गाडीतून फिरताना मिळालेले भौतिक सुख एकीकडे तर दुसऱ्या बाजूला विना खर्चाची मिळालेली स्वच्छ हवा आणि पैशात मोजता न येणारा आनंद. खरेतर फिरत असताना जाणवलेली एक महत्वाची गोष्ट तुमच्याकडे पैसा असून चालत नाही तर तुम्ही शाररीक आणि मानसिकदृष्ट्या तंदुरुस्त पाहिजे. मुलांनी गाईड कडून घेतलेले ज्ञान त्यांच्या ज्ञानात भर टाकत राहिले. नियोजनातील वैशिष्ट्य म्हणजे हॉटेलची निवड पूर्ण शाकाहारी, बार नाही. त्यामुळे इतर विकृत गोष्टीना आळा आलाच.

ट्रीपमध्ये चहा घेत असताना तोसुद्धा चिनीमातीच्या कपात, कुठेही प्लास्टिक वापर नाही एवढेच नव्हेतर भ्रमंती करीत असताना प्लास्टिकचा वापर करू नये याविषयी केलेले प्रबोधन व पडलेल्या प्लास्टिकच्या वस्तू उचलून घेऊन त्याची योग्य ठिकाणी विल्हेवाट असा अनोखा उपक्रम राबविणारी सहल बरेच काही शिकवून गेली. बऱ्याच चांगल्या आणि वाईट गोष्टी येतातच. परंतु रोटरी क्लबचे अध्यक्ष रो. महेश झंवर आणि कार्यवाह रो. डॉ.अभिजित उदगावकर यांनी केलेले नियोजन आणि रो.अमित कुरबेट्टी यांनी केलेली अंमलबजावणी यामुळे सहल यशस्वी होऊ शकली.

***(लेखक हे महाराष्ट्र शासनाच्या मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे सदस्य आहेत.)***

## *Ann’s Corner*



**Mrs. Sunita Vijay Bajaj**

***Past President,***
***Inner Wheel  Club of Sangli.***

तीन प्रहर तो बीत गए, बस एक प्रहर बाक़ी है।
जिवन हाथों से फिसल गया, बस ख़ाली मुट्ठी बाक़ी है।
सब कुछ पाया इस जिवन में, फिर भी इच्छाएँ बाक़ी है।
दुनिया से हमने क्या पाया ? यह लेखा जोखा बहूत हुआ,
इस जग ने हमसे क्या पाया ? बस ये गणनाएं बाक़ी है।
इस भाग दौड की दुनिया में, हम को एक पल का  होश नहीं,
वैसे तो जिवन  सुखमय है, पर फिर भी क्यों संतोष नहीं ?
क्या यूँ ही जिवन बीतेगा ?
क्या यूँ ही साँसे बंद होगी ?
औरों की पीड़ा देख समझ कब अपनी आँखें नम होगी ?
मन के अंतर में कई छिपे इस प्रश्न का उत्तर बाक़ी है।
मेरी ख़ुशियाँ, मेरे सपने ,मेरे बच्चे ,मेरे अपने ..
यह करते करते शाम हुई
इससे पहले तम छा जाएं, इससे पहले की शाम ढले,
कुछ दूर पराई बस्ती में एक  दीपक जलाना बाक़ी है।
तीन प्रहर तो बीत गए, बस एक प्रहर ही बाक़ी है।
जिवन हाथों से फिसल गया, बस खाली मुट्ठी बाक़ी है।

जिवन की सारी दौड केवल अतिरिक्त के लिए है। अतिरिक्त पैसा, अतिरिक्त पहचान, अतिरिक्त प्रसिद्धी, अतिरिक्त प्रतिष्ठा, अगर यह अतिरिक्त पाने की लालसा न हो तो  जिवन एकदम सरल है।

तो दोस्तों, यह अतिरिक्त को हमारे जिवन से भगाने के लिए चलो हम हमारी ईगो को बाज़ू करें। और जिवन सीधा साधा, सरल बनाने के लिए साथ मिलकर चलें।